पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ४४३ दिनांक - १९/०६/२०२३**

## खंडणी विरोधी पथक - २ गुन्हे शाखा, पुणे शहर

## भारतीय सैन्य दला मधुन लेस हवालदार पदाची नोकरी सोडून आलेला व भारतीय सैन्य दलातील सुभेदार पदाची वर्दी परिधान करुन फसवणूक करणा-या इसमावर कारवाई

मिलिटरी इंटेलिजन्स सदन कमांड,पुणे यांचेकडुन प्राप्त तक्रारी नुसार संशयित इसम नामे **प्रशांत भाऊराव पाटील,वय-३२ वर्ष,रा.म्हेत्रे निवास दुर्गानिवास,सोनवणे वस्ती,चिखली,पुणे व मुळ रा.मु.पो. कुपतगिरी ता.खानापूर,जि.बेळगाव** याची माहिती घेतली. सन २०१९ पासून तो भारतीय सैन्य दलाचे पॅरा मिलिटरी फोर्स आसाम रायफल मधून लेस हवालदार पदाची नोकरी सोडून आला आहे. तो सन २०१९ पासून ते आज रोजी पर्यन्त भारतीय सैन्य दलामध्ये नोकरी करत नाही. तरी सुध्दा सन २०१९ पासून ते आज रोजी पर्यन्त भारतीय सैन्य दलामध्ये असल्याचे भासवून, त्याने खडकी पुणे येथील सैन्य दलाचे युनिफॉर्म विक्री करणारे दुकानदार रिटायर्ड सुभेदार मेजर सुरेश मोरे यांचेकडून सैन्य दलाचे सुभेदार पदाचे दोन युनिफॉर्म व इतर साहित्य किं.रु.४,७००/- चे खरेदी करुन पैसे नंतर देतो असे सांगितले परंतु अदयापपर्यन्त पैसे न देता त्यांची आर्थिक फसवणूक केली आहे. तसेच त्याने सदनकमांड मध्ये कार्यरत असल्याचे भासवून सैन्य दलाचा युनिफॉर्म परिधान केला आणि सैन्य दलाचा युनिफॉर्म असलेले फोटो बनावट आय.डी.वापरुन सदनकमांड हेडक्वॉटर क्वीन्स गार्डन पुणे या सैन्य दलाचे प्रमुख कार्यालयाचे परिसरात तो अधिकारी असल्याचे दाखवून फिरत होता. तसेच तो राहात नसलेल्या सदनकमांड पुणे या कार्यालयाचे पत्त्याचा वापर करुन तीन बनावट आधारकार्ड तयार केले आहेत. तसेच पॅनकार्ड व ओळखपत्रावर भारतीय सैन्य दलाचे युनिफॉर्म परिधान केलेल्या फोटोचा वापर करून फसवणूक करत असल्याने त्याचा खंडणी विरोधी पथक-२,गुन्हे शाखा,पुणे यांचेकडील अधिकारी व अंमलदार यांनी मिलिटरी इंटेलिजन्स सदनकमांड पुणे टिमचे मदतीने शोध घेत असताना तो ब-याच वेळा हुलकावणी देत होता. तो वारंवार आपले लोकेशन बदलून स्वतःची ओळख लपवत होता. परंतु त्याचेवर खंडणी विरोधी पथक-२ यांनी पाळत ठेवून त्यास शिताफीने पकडून ताब्यात घेतले आणि पोलीस नाईक अमोल पिलाणे, खंडणी विरोधी पथक-२ यांनी त्याचेविरुध्द फिर्याद दिल्याने **बंडगार्डन पोलीस स्टेशन गु.रजि.नं. १८४/२०२३ भा.दं.वि.कलम १७०,१७१,४२०,४६५,४६८,४७१** प्रमाणे गुन्हा नोंद करुन आरोपीस अटक करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी ही मा.पोलीस आयुक्त,श्री.रितेश कुमार, मा.सह पोलीस आयुक्त,श्री.संदिप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,(गुन्हे),श्री.रामनाथ पोकळे, मा.पोलीस उप-आयुक्त,(गुन्हे),श्री.अमोल झेंडे, मा. सहा.पोलीस आयुक्त,गुन्हे-२,श्री.सतिश गोवेकर यांचे मार्गदर्शानाखाली खंडणी विरोधी पथक-२,गुन्हे शाखा, पुणेचे पोलीस निरीक्षक,श्री.प्रताप मानकर, सहा.पो.निरी.चांगदेव सजगणे, पोलीस उपनिरीक्षक,श्रीकांत चव्हाण, मोहनदास जाधव व पोलीस अंमलदार, विजय गुरव, प्रदिप शितोळे, सुरेंद्र जगदाळे, विनोद साळुंके, संग्राम शिनगारे, ईश्वर आंधळे, अनिल मेंगडे, राहुल उत्तरकर, सैदोबा भोजराव, सचिन अहिवळे, अमोल पिलाने, चेतन आपटे, शंकर संपते, पवन भोसले, चेतन शिरोळकर, प्रदिप गाडे, आशा कोळेकर यांनी केलेली आहे.